# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते एम विभाग)

क्र. सहा.अभि./घकव्य/ 3100 / एस दि.10.10.2026

## स्वारस्य अभिव्यक्ती

'एस' विभागातील मुख्य रस्ते एल.बी.एस. मार्ग, जे.व्ही.एल.आर. मार्ग व रेल्वे स्थानक व इतर रस्ते ब्रशिंग करून स्वच्छ करण्याकरिता.

सदर मुख्य रस्ते एल.बी.एस. मार्ग, जे.व्ही.एल.आर. मार्ग व रेल्वे स्थानक व इतर रस्ते ब्रशिंग करून स्वच्छ करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्तीद्वारे एस विभागातील स्थानिक इच्छुक संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या अर्जातुन सोडत काढून कामाचे वाटप करण्यात येईल. इच्छुक संस्थानी याबाबतचा तपशील, सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे संपर्क साधावा, सदर अर्जाचा नमुना हा रु. 3,993/- + 18% GST कर भरुन सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

**विशेष सूचना :- सदर योजनेत कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कोर्ट संरक्षित (Court Protected) कामगार यांना प्राधान्याने काम देणे आवश्यक असून, सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थाना कार्यालयामार्फत नेमून दिलेल्या युनिट एवढे कामगारांची यादी देण्यात येईल सदर यादीप्रमाणेच कामगार नियुक्त करणे व किमान वेतन नुसार अधिदान करणे संस्थाना बंधनकारक असेल याची नोंद घ्यावी.**

सदर काम तातडीचे असल्याने अर्ज करण्याची मुदत ही दि.10.10.2026 (सकाळी 10.00) ते दि.15.10.2026 (सायंकाळी 05.00) पर्यंत असून, संस्थेने निविदा अर्ज दि.15.10.2026 रोजी 05.30 सायकाळी वाजेपर्यंत जमा करावे. जमा करताना संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्रे व छाननी शुल्क रु.3,993/- + 18% टक्के GST भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज बाद करण्यात येईल व अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि.15.10.2026 रोजी सायंकाळी 05.30 वाजेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

सदर योजनेच्या सोडतीसाठी, दिनांक व वेळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-

सहा. अभि. (घ.क.व्य.) 'एस' विभाग